अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

राज ठाकरेंना तडीपारची नोटीस अन् गुन्ह्याप्रकरणी हायकोर्टाचा मोठा दिलासा

राज ठाकरे यांनी आपल्यावरील गुन्हे आणि त्या अनुषंगानं न्यायालयानं सुरू केलेली कारवाई रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल केलेली. याच दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देत राज ठाकरेंची याचिका हायकोर्टानं स्वीकारली. १५ ऑक्टोबर रोजी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठानं यावर आपला निकाल राखून ठेवला होता. आज (शुक्रवारी) न्यायालयानं हा निकाल जाहीर केला. सीआरपीसी कलम १८८ अंतर्गत सुरू केलेली कारवाई दखलपात्र आहे. त्यामुळे केवळ गुन्हा दाखल केला म्हणून कारवाई सुरू करू शकत नाही. त्यासाठी कोणीतरी तक्रार रितसर करणं आवश्यक असतं. याप्रकरणी कोणतीही तक्रार दाखल नाही, त्यामुळे दंडाधिकारी कोर्टानं सुरू केलेली कारवाई ही कायद्याला अनुसरून नाही.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -५३ | शुक्रवार दि.१० नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -53 | FRIDAY DT.10 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

आमचं वाटोळं कोण करतंय, 'त्या' सहा जणांची नावं २४ तारखेला सांगतो

मनोज जरांगे पाटलांचा इशारा कुणाला?

छत्रपती संभाजीनगर : 'तुम्ही कुणासाठी काम करता हे आम्हाला आता कळलं असून तुमच्या सल्ल्याची आम्हाला गरज नाही, वेळोवेळी वेगवगेळी वक्तव्य करून तुम्ही सरड्यासारखे रंग बदलत आहात. तुमच्यासारखा विरोधी पक्ष देशात कुणी नाही, तुमची विचारधारा मराठ्यांविषयी विष पेरणारी असून मराठ्यांचे मुडदे पडायला तुम्ही जबाबदार आहात, असे आरोप करत येत्या २४ डिसेंबरला मराठा समाजाचे वाटोळं करणाऱ्या सहा जणांची नावेही सांगतो असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणावरून राज्यात रान पेटले असून छगन भुजबळ-मनोज जरांगे यांच्यातला शाब्दिक वाद शमतो ना शमतो तोवरच नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विरोधी पक्षनेते विजय वड्डेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यांनंतर मनोज जरांगे यांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. विजय वड्डेट्टीवार यांनी म्हटले की, 'मराठा तरुणांनी अभ्यास करून विचार करून आपण कोणाला साथ देत आहे, आपला भलं कशात आहे, हित कशात आहे, याचा विचार करावा...असे विधान केले आहे. यावर प्रत्युत्तर देताना मनोज जरांगे यांनी चांगलीच खरडपट्टी काढली आहे. ते म्हणाले की, आम्हाला मोडायचा सामूहिक कट तुम्ही रचला होता. आता फालतू शब्द बोलून लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करत आहात. पण आमची मुलं दूधखुळी नाहीत, मराठ्यांचे मुडदे पडायला तुम्ही जबाबदार आहात, आता तुमच्या सल्ल्याची सुद्धा गरज नाही, अशा शब्दांत जरांगे यांनी वड्डेट्टीवार यांना सुनावले आहे. मनोज जरांगे यावेळी म्हणाले की, अशा लोकांना गोरगरीब आठवत नाही. मात्र आता हे कुणासाठी काम करता हे कळलं आहे. कधी काय तर कधी काय? तुम्ही सरड्यासारखे रंग बदलत आहात. तुमच्यासारखा विरोधी पक्ष देशात कुणी नाही. मुळात यांची विचारधारा मराठ्यांविषयी विष पेरणारी आहे. हा मनोज जरांगे राजकारणासाठी करतो, असे एकही मराठा ओबीसी महणू शकत नाही. तुम्हाला मराठा समाजशिवाय माया नाही, आम्हाला तुम्ही सांगू नका, काय करायचं, अभ्यास करायचा की नाही, आमच्या मुलांच्या बुद्धी ठेप्यावर आहे, आमच्या मुलांना तुम्ही सांगायची गरज नाही. तुमच्यासारख्या लोकांनीच आम्हाला संपवलं आहे. आम्हाला मोडायचा सामूहिक कट तुम्ही रचला होता. आता फालतू शब्द बोलून लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत, पण हे होऊ देणार नाही, असा सज्जड दमच मनोज जरांगे यांनी दिला आहे.

निर्दोष लोकांना अटक करण्याचं काहीच कारण नाही

तो मराठा असो; बीड जाळपोळ प्रकरणी पंकजा मुंडेंचं वक्तव्य

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा समाज आक्रमक झालेला असतानाच बीडमध्ये अनेक ठिकाणी जाळपोळ आणि हिंसाचार घडला. यानंतर आता भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी जाळपोळ झालेल्या ठिकाणांची पाहणी केली. यावेळी पंकजा मुंडेंनी या प्रकरणी निर्दोष लोकांना अटक करण्याचं काहीच कारण नसल्याचं मत व्यक्त केलं. तसेच पोलीस यंत्रणेने सावधपणे भूमिका घेतली पाहिजे, असं सूचक वक्तव्य केलं. त्या बुधवारी (८ नोव्हेंबर) टीव्ही ९ मराठीला दिलेल्या प्रतिक्रियेत बोलत होत्या.

पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रचंड भयानक स्थिती आहे. हे बघून मी फार अस्वस्थ झाले. अशा गोष्टी होऊ नयेत असं मला वाटतं. मी या जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून काम केलं आहे. अजूनही माझ्या मनात पालकाची भूमिका आहे. त्यामुळे मी सर्वांची भेट घेतली.

मी पीडितांशी चर्चा केली. ते प्रचंड अस्वस्थ आणि घाबरलेल्या स्थितीत होते. ते सर्व आता सावरण्याचा प्रयत्न करत आहेत. एखादी अप्रिय घटना घडली आणि ती रोखता आली नाही, तर स्वाभाविकपणे वाटतं की, येथून पुढे गुप्तचर विभाग आणि पोलीस यंत्रणांनी सावधपणे भूमिका घेतली पाहिजे, असं मत पंकजा मुंडेंनी व्यक्त केलं.

या प्रकरणाची विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) माध्यमातून चौकशी करावी. जे निर्दोष आहेत त्यांना या प्रकरणात अटक करण्याचं काहीच कारण नाही.

प्रसिध्द सराफ व्यावसायिकावर पुण्यात गोळीबार

लाखो करोडोचं सोन लुटलं...!

पुणे (प्रतिनिधी)

पुणे : पुण्यामधील एका प्रसिध्द सराफ व्यावसायिक (प्रतीक ओसवाल) यांच्यावर ऐन दिवाळीच्या तोंडावर गोळीबार करून लाखो रुपयांचे सोने लुटून नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.तसेच या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.पुणे शहरातील वानवडी भागातील बी.टी वकडे रोडवर ही घटना घडली आहे. गोळीबार केल्यानंतर व्यावसायिकाकडील लाखो करोडोचं सोनं लुटून नेल्याचे सांगण्यात आले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिक मदनलाल ओसवाल असे असे गोळीबारात जखमी झालेल्या सराफ व्यवसायिकाचे नाव आहे. त्यांच्यावर अचानक गोळीबार करण्यात आल्यामुळे त्यांना काही समजायच्या आत हल्लेखोरांनी सोने घेऊन पोबारा केला. गोळीबारात व्यावसायिक गंभीर जखमी झाला. प्रतिक वडिलांसोबत दुचाकीवरून जात होता तेव्हा ही घटना घडली. दुचाकीवरून पुण्यातील क्रोम मॉल चौकापासून बी.टी कवडे रोड कडे जात असताना रस्त्यावर अज्ञातांनी गोळीबार केला. ही घटना बुधवारच्या रात्री ९ वाजता घडली. दुचाकीवरून आलेल्या ३ जणांनी गोळी झाडली. घटनेत प्रतिकला तोंडावर आणि मांडीत गोळी लागली आणि तो जखमी झाला.

गोळीबाराच्या आवाजाने रस्त्यावर मोठा गोंधळ पसरला. या घटनेची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली. पोलीस ताबडतोब घटनास्थळी दाखल झाले. आणि त्यांनी तपास सुरु केला. तसेच जखमी प्रतिकला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पंकजाताई मुंडे यांनी दिला बंजारा समाजातील युवा कार्यकर्त्याला न्याय

वसंतराव नाईक तांडा सुधार समितीच्या जिल्हाध्यक्षपदी पप्पू चव्हाण यांची नियुक्ती

पंकजाताईंचा विश्वास सार्थ करून दाखवू

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे हया नेहमीच सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या असतात, त्याचीच परिणीती पुन्हा आली. कौठळीच्या बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांची वसंतराव नाईक तांडा सुधार समितीच्या जिल्हाध्यक्ष म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. बंजारा समाजातील युवा कार्यकर्त्यांला पंकजाताईंनी न्याय दिला अशी भावना समाज बांधवांनी व्यक्त केली आहे.

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या अंतर्गत हाती घ्यावयाची कामे जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखालील समितीस सुचविण्याकरिता बंजारा बहुल जिल्ह्यासाठी स्थापन करावयाच्या समितीच्या अध्यक्षपदी कौठळीचे भाजपाचे युवा कार्यकर्ते बाळासाहेब भाऊराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली असून तसे आदेश आज शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात आले. नियुक्ती नंतर चव्हाण यांनी आज यशःश्री निवासस्थानी येऊन पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली व नियुक्तीबद्दल आभार मानले. यावेळी पंकजाताईंनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, कौठळीचे साहेबराव चव्हाण, चंद्रकांत देवकते, सरपंच काटे, सुंदर वाघमोडे, सोमनवाडीचे सरपंच गोविंद सोनवणे व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, पंकजाताईंनी माझ्यावर जो विश्वास टाकून जबाबदारी दिली तो विश्वास जन सामान्यांची कामे करून सार्थ करून दाखवू असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

१७८ तालुक्यांतील ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर

मुंबई : राज्यातील केवळ ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केल्यामुळे सरकारवर होणारी टीका लक्षात घेता, दुष्काळाची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ४० तालुक्यांव्यतिरिक्त उर्वरित १७८ तालुक्यातील ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे.

मंत्रालयातील वॉर रूममध्ये मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक गुरुवारी झाली. यात हा निर्णय घेण्यात आला. उपसमितीचे सदस्य तथा सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, महसूलमंत्री विखे-पाटील, अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी योजनामंत्री संदीपान भुमरे, बैठकीला उपस्थित होते.

केंद्राच्या निकषाप्रमाणे ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. मात्र, ७५० मिमीपेक्षा कमी पाऊस, असा निकष लक्षात घेऊन ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केल्याचे मंत्री अनिल पाटील यांनी सांगितले.

या सवलती मिळणार

दुष्काळग्रस्तांना देण्यात येणार्या जमीन महसूलात घट, पीककर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषिपंपांच्या वीजबिलात ३३.५ टक्के सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शुल्कात माफी, आवश्यक तिथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकर्यांच्या शेतीपंपांची वीजजोडणी खंडित न करणे

बीड जिल्ह्यातील आणखी ८ तालुक्यातील ५२ महसुली मंडळांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश

तीन तालुक्यांचा याआधीच केला होता समावेश

जून पासून पावसाळ्याच्या अखेरपर्यंत पावसाचे पडलेले प्रमाण तसेच कोरड्या दुष्काळाचे मापदंड त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील पाणीसाठे या सर्वांचा विचार करून बीड जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ५२ महसुली मंडळांचा आज नव्याने दुष्काळग्रस्त म्हणून समावेश करण्यात आला आहे.

यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीचे आज मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मंत्रिमंडळ उपसमितीचे सदस्य मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, संदीपान भुमरे आदींसह मदत व पुनर्वसन तसेच महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील धारूर, वडवणी व अंबाजोगाई या तीन तालुक्यांचा महसूल विभागाने दि.३१ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे याआधीच दुष्काळग्रस्त तालुक्यांचा यादीत समावेश केलेला आहे. त्यानंतर आता बीड जिल्ह्यातील उर्वरित परळी, आष्टी,

पंकजाताई मुंडेंनी नेहमीप्रमाणे परळीत घेतल्या भेटीगाठी खालेदराज, डुबे, काटकर परिवाराचे केले सांत्वन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी नेहमीप्रमाणे शहरातील नागरिक तसेच कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. शहरात विविध परिवाराच्या घरी सांत्वनपर भेटी देऊन त्यांनी त्यांचे सांत्वन केले.

पंकजाताई मुंडे यांनी आज दिवसभर यशःश्री निवासस्थान येथे शहरातील तसेच जिल्हय़ातील नागरिक व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या तसेच जनतेची गाऱ्हाणी ऐकून समस्यांची सोडवणूक केली. विविध गांवच्या नवनिर्वाचित सरपंच आणि विजयी सदस्यांनी देखील त्यांची भेट घेऊन आभार मानले, यावेळी पंकजाताईंनी

सर्वांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. सायंकाळी त्यांनी विद्यानगर भागात सेवानिवृत्त शिक्षक नानासाहेब कवडे यांच्या घरी भेट दिली, यावेळी कवडे परिवाराने त्यांचा कौटुंबिक सत्कार केला.

सांत्वनपर भेटी

पंकजाताई मुंडे यांनी शहरातील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते खालेदराज यांच्या मातोश्रीचे तसेच प्रसिद्ध व्यापारी अनंतराव डुबे आणि ज्येष्ठ नागरिक पदमाकर काटकर यांचे नुकतेच दुःखद निधन झाले, या सर्व परिवाराच्या घरी भेट देऊन त्यांनी परिवाराचे सांत्वन केले व धीर दिला.

रुग्णांना दीपावली फराळ वाटप करुन प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने परंपरा जोपासत रुग्णांची दिवाळी केली गोड

राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील ३५ वर्षा पासून प्रियदर्शनी क्रीडा मंडळ जोपासत आहे अविरत सेवेचा वसा

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- स्वा रा ती च्या रुग्ण व नातेवाईक यांची देखील दिवाळी त्याना फराळाचे वाटप करत प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यायाम मंडळाने सलग ३५ व्या वर्षी स्वा रा ती मधील रुग्णांना दीपावलीच्या निमित्ताने फराळ वाटप करत आले आहे.मागील ३५ वर्ष अविरतपणे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे रुग्णसेवेची सामाजिक परंपरा जोपासण्याचे कार्य करीत आहे. हीच परंपरा पुढे जोपासत आज शुक्रवार दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना प्रियदर्शनी सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी अनेक सहकाऱ्यांच्या उपस्थितीत दिवाळी फराळ वाटप केला .

गेल्या ३५ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील रूग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू झालेली आहे. दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३५ वर्ष सातत्य टिकवलेले आहे. राजकिशोर मोदी यांनी १९८९ साली प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतीक व व्यायाम मंडळाची स्थापना केली. तेंव्हाच्या सर्व तरूण सहकार्यांनी एकत्र येवून मंडळामार्फत विविध प्रकारची सामाजिक उपक्रम , विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस केला होता .त्याचाच एक भाग म्हणून स्वा रा ती येथील रुग्णांसाठी हा दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम सुद्धा सुरू केला. ज्याचा सकारात्मक परिणाम रुग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांच्यावर झाला. राजकिशोर मोदी हे सातत्याने वेगवेगळ्या घटक व विविध विषयांवर काम करत आहेत.ज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड , महारक्तदान शिबीर,कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य वाटप, कोरोना योद्धा सन्मान, निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी वॉकेथॉन ही व अशी अनेक सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य सातत्याने सुरू असून याकामात त्यांना सर्व सहकार्यांचे पाठबळ मिळत आहे. म्हणूनच हा उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू आहे. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावली च्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम देखील राजकिशोर मोदी आणि त्यांचे सहकारी करत होते .

या फराळ वाटपाच्या कार्यक्रमास राजकिशोर मोदी यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे, डॉ. राकेश जाधव, ऍड विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, तानाजी देशमुख , महादेव आदमाने, अमोल लोमटे, संतोष शिनगारे , दिनेश भराडीया, धम्मा सरवदे , सुनील व्यवहारे , सुनील वाघाळकर , गणेश मसने, कचरू सारडा, विष्णू पांचाळ,बबन पानकोळी, रुपेश चव्हाण, अशोक देवकर, काझी खायमिद्दीन, विजय रापतवार, हर्षवर्धन वडमारे,राजू मोरे, सुधाकर टेकाळे, रफिक गवळी, दत्ता सरवदे,गोविंद पोतंगले, खलील जाफरी, सय्यद ताहेर, सचिन जाधव , जावेद गवळी, विशाल पोटभरे, आकाश कऱ्हाड, महेश कदम, संतोष चिमणे, शुभम लखेरा,कैलास कांबळे, तौफिक सिद्दीकी, जमादार पठाण,शाहिद शेख, महेबूब गवळी, महेश वेडे, उज्जेन बनसोडे, विशाल जगताप, गुड्डू जोगदंड, अमोल मिसाळ , अजीम जरगर , गोविंद टेकाळे, शुभम लखेरा,सुशील जोशी, रोहन कुरे, रोहित देवकर, महेश वेदपाठ, आशिष ढेले, जावेद भाई आदीसह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी , राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

बलीप्रतिपदेच्या पूर्वदिनी बळीराजाचा आक्रोश

शेतकऱ्यांच्या विविध मागणीला घेऊन किसान सभा पुन्हा रस्त्यावर

परळी / प्रतिनिधी

सर्व प्रजेला समतेची अन् ममतेची वागणूक देणाऱ्या व प्रजेच्या सुखातच स्वतःचे सुख मानणाऱ्या महाबली बळीराजाच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून बलिप्रतिपदेच्या पूर्व दिनी दि. १३ नोव्हेंबर सोमवार रोजी सकाळी ११ वा. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी अखिल भारतीय किसान सभा बळीराजाच्या मिरवणुकीसह बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर ह.भ.प श्यामसुंदर सोन्नर महाराज यांचे बळीराजाच्या जीवनावर कीर्तन आंदोलन करण्यात येणार असून या कीर्तन आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन किसान सभेकडून करण्यात येणार आल्याची माहिती किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड अजय बुरांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सत्ता सिंहासनावर बसलेले आधुनिक वामन सर्वपरी सर्वसामान्य रयतेला छळत आहेत, आणि बळीचा वारसा जपणारा खरा शेतकरी मात्र अस्तित्वासाठी धडपडत आहे.सत्ताधारी शेतक-यांचा पुळका दाखवून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणाबाजी करतात वास्तवात मात्र उत्पादन खर्चात दुपटीपेक्षा

जास्त वाढ झाली. किफायतशीर हमीभावाचे भिजत घोंगडे अजून तसेच ताटकळत आहे. याउपर किसान सन्मानच्या नावाने दोन हजार रुपयांचा आवळा देऊन हमी भाव पाडून कवळा काढण्याचा कार्यक्रम सत्ताधाऱ्यांनी राबवला आहे. 'भीक नको कुत्रे आवर' दोन हजाराचा सन्मान नको किफायतशीर हमीभाव हवा अशी मागणी करत आहे. पाऊस कमी पडला. दुष्काळाची परिस्थिती गंभीर असताना पैसेवारी सुद्धा पत्रास टक्क्याच्या आत असताना जिल्हा दुष्काळ ग्रस्त घोषित होत नाही ना पिक विमा अग्रीम घोषित होऊनही मिळत नाही. सरकारमधील पक्षांना निवडणुकीचे वेद लागले आहेत. निवडणुकीचे डावपेच आखण्यात सर्व राजकारणी दंग आहेत. कुणालाच शेतक-यांची चाड नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांना वाचा फोडण्यासाठी बळीराजाच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून आखील भारतीय किसान सभा पुन्हा रस्त्यावर उतरत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बळीराजा मिरवणूक काढून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बळीराजा जीवनावर सोन्नर महाराज यांचे कीर्तन आंदोलन सोमवार दि १३ रोजी करणार असल्याची माहिती किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे,जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे,कॉ. काशिराम सिरसाट,कॉ. दत्ता डाके,कॉ. भगवान बडे, कॉ. जगदीश फडताडे, कॉ. दादासाहेब सिरसाट यांनी दिली आहे.

पालकमंत्री धनंजय मुंडे व बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रयत्नातुन केज-टाकळी मार्गे बस सेवा चालू ईतरांनी श्रेय घेऊ नये - श्रीकांत घुले

केज /प्रतिनिधी

केज तालुक्यातीलटाकळी या गावाला गेल्या अनेक वर्षापासून एसटी बस चालू नव्हती.परंतु राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते प्रयत्नातुन केज-टाकळी मार्गे चिंचोली माळी,वरपगाव ही बस सेवा प्रवाशांच्या सोयी करता चालू करण्यात आली आहे.असे युवानेते श्रीकांत घुले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माहिती दिली आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील टाकळी या गावची जवळपास ४५०० ते ५००० एवढी लोकसंख्या आहे.परंतु गेले अनेक वर्षापासून या गावात बस चालू नव्हती म्हणून टाकळी ग्राम पंचायतच्या माध्यमातून गेले सहा महिन्यापासून राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते श्रीकांत घुले यांच्यासह गावातील ग्रामस्थांनी वेळोवेळी पाठपुरावा करून दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रत्यक्षात धारूरआगाराची बस ही केज-टाकळी मार्गे चिंचोली माळी,वरपगाव नियमित चालू झाली आहे अशी माहिती श्रीकांत घुले यांनी दिली आहे.दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी टाकळी ग्रामपंचायतचे सरपंच,उपसरपंच यांच्या स्वाक्षरीचे पत्र विभागीय नियंत्रक राज्य परिवहन विभाग बीड यांना देऊन बस सेवा चालू करण्याची मागणी करण्यात आली होती.पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दोन वेळा संबंधित विभागाला मोबाईल दूरध्वनीवरून फोन करून आदेश दिले होते की,केज तालुक्या तील टाकळी या गावाला आपण तात्काळ बस सेवा चालू करावी तसेच अनेक वेळा स्वतः पालकमंत्री यांनी पाठपुरावा केला होता.त्याचबरोबर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे यांनी देखील स्वतःश्रीकांत घुले यांच्या सोबत जाऊन बस सेवा चालू करण्याचा पाठपुरावा केल्यामुळेच आमच्या गावात बस सेवा चालू झाली अशी प्रतिक्रिया श्रीकांत घुले यांनी दिली आहे.पुढे बोलताना घुले म्हणाले की,पालकमंत्री धनंजय मुंडे व बजरंग बप्पा सोनवणे यांच्या मार्गदर्शना खाली आम्ही स्वतःव ग्रामस्थांनी वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या संबंधित विभागाशी व त्यांच्या अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करून सदर बस सेवा चालू केले असून याचे श्रेय कोणीही घेऊ नये असे बोलताना त्यांनी म्हटले असता आमच्या प्रतिनिधीं नी विचारलेला प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की,विद्यमान आमदार यांच्या सत्यप्रेम इंगळे नावाच्या एका कार्यकर्त्यांनी चिंचोली जिल्हा परिषद सर्कल या व्हाट्सअप ग्रुप वर ९०४९९९९७१६ या मोबाईल क्रमांक वरून सदर ग्रुप वर पोस्ट केली होती की,सदरची बससेवा ही त्यांनी चालू केली आहे. परंतु सदरची बस सेवा ही आम्ही स्वतः व आमच्या गावकऱ्यांनी आमच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शना खाली ही बस सेवा चालू केली आहे.त्यामुळे कोणीही श्रेय घेऊ नये असे त्यांनी सांगितले

आहे.दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी टाकळी गावात बस आली असता माजी उपसभापती नारायण बप्पा घुले यांच्या हस्ते बसला हार घालून श्रीफळ फोडून बसचे वाहक व चालक यांचे शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. गावातील नागरिकांनी मोठ्या उत्सवात बसचे स्वागत करून प्रवास केला आहे.यावेळी माजी उपसभापती नारायण बप्पा घुले,अनंतकुमार घुले,श्रीकांत घुले,ग्राम पंचायत सदस्य विक्रम घुले,अरुण बप्पा घुले, सुरेश घुले,महेंद्र बारगजे, सौ.मीरा सिरसट,भिकाजी घुले,मिनीनाथ घुले,दशरथ घुले,अच्युत राख,बालाजी बारगजे,बालाजी कांदे, मुकेश घुले,शिवा भारती, अबींर शेख,विष्णू ज्ञानोबा घुले,व्यंकट घुले,जीवन शिरसट,धोंडीराम सिरसट, कलावतीबाई बारगजे यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक,महिला,युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.केज-टाकळी मार्गे चिंचोली माळी,वरपगाव ही बस सेवा चालू झाल्या मुळे गावातीलनागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

कळंब आगाराची केज- कळंब बस ही टाकळी मार्गे चालू करण्याकरिता आमच्या नेत्याच्या मार्ग दर्शनाखाली आम्ही स्वतः व आमचे गावकरी पाठ पुरावा करत आहोत. लवकरच ती ही बस सेवा चालू करण्यात येईल असे श्रीकांत घुले यांनी माहिती दिली आहे.तसेच पालकमंत्री धनंजय मुंडे,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बजरंग बप्पा सोनवणे,विभागीय नियंत्रकमोरे,आगारप्रमुख चौरे यांच्या सह संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे श्रीकांत घुले व टाकळी ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

शब्दगंध च्या वतीने दीपावली पाडव्या निमित्त उत्सव 'ती' च्या कवितेचा काव्यसंमेलन

अहमदनगर ।प्रतिनिधी

शब्दगंध साहित्यिक परिषद,महाराष्ट्र राज्य च्या वतीने दीपावली पाडव्या निमित्त खास काव्य रसिकांसाठी उत्सव ' ती ' च्या कवितेचा काव्यसंमेलन छत्रपती संभाजीनगर येथील प्रा.प्रिया धारूरकर यांच्या अध्यक्षतेखाली कोहिनूर मंगल कार्यालय,पाईपलाईन रोड,सावेडी येथे मंगळवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी दु ४ वा आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे व संस्थापक, सचिव सुनील गोसावी यांनी दिली.शब्दगंध च्या वतीने दरवर्षी दीपावली पाडव्यानिमित्त वेगवेगळ्या संकल्पनेवर आधारित काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात येते,यावर्षी महिलांचा सन्मान करण्यासाठी उत्सव ' ती ' च्या कवितेचा हा काव्यसंमेलन चा कार्यक्रम होत आहे.यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती लतिका पवार उपस्थित राहणार आहेत.या काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी,स्वाती ठुबे करणार असून कवयित्री सरोज अल्हाट,सुरेखा घोलप,प्रा.मेधाताई काळे, प्रा. सुनीता

गायकवाड,ऋता ठाकूर,बेबीताई गायकवाड,मंजुश्री वाळुंज,सुवर्ण लता गायकवाड, सुजाता रासकर,ज्योती गोसावी,सुषमा भालेकर,उज्वला धस,प्रबोधिनी पठाडे,दुर्गा कवडे,समृद्धी सुर्वे,प्रांजली वीरकर,सुजाता पुरी,मीरा आर्ले,जयश्री मंडलिक,सरला सातपुते,संध्या शिंदे,शामा मंडलिक,वर्षा भोईटे, स्वाती पुरी,नीता आंधळे, स्वाती पुरी,संगीता फसाटे इत्यादी महिला कवयित्री सहभागी होणार आहेत. तरी या कार्यक्रमास साहित्य रसिकांनी उपस्थित राहून काव्यानंद घ्यावा असे आवाहन शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सचिव सुनील गोसावी,डॉ.अशोक कानडे,सुभाष सोनवणे,भगवान राऊत, संयोजन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे,भारत गाडेकर,प्राचार्य डॉ.गुंफा कोकाटे, डॉ.तुकाराम गोंदकर,सुनील धस,किशोर डोंगरे,राजेंद्र पवार,रामकिसन माने,बबनराव गिरी,अजयकुमार पवार यांनी केले आहे.

बाजारपेठेला दिवाळीची झळाळी

गडब/सुरेश म्हात्रे

दिवाळी अवघ्या दोन दिवसांवर येऊ ठेपली आहे. विद्यूत वस्तूंसह कपडे, वाहने व गृहपयोगी वस्तूंनी बाजारपेठा गजबजल्या आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या सवलती विक्रेत्यांकडून ठेवण्यात आल्या आहेत. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीवर धमाका ऑफर सुरु असल्याने त्याठिकाणी ग्राहकांची अधिक होत असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे.

दिवाळीच्या प्रकाशोत्सवाला (दि. १०) पासून सुरुवात होत आहे. शहरी भागासह ग्रामीण भागात गेल्या दोन दिवसांपासून खरेदीला उधाण आले आहे. बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडाल्याचे चित्र दिसून आले. दिवाळीत गोड पदार्थांसह फराळाचा आस्वाद ग्राहकांना घेता यावा यासाठी अनेक प्रकारचे खाद्य पदार्थ बाजारात उपलब्ध झाले आहेत. वेगवेगळ्या आकाराच्या आकर्षित पाकीटमध्ये या वस्तू खरेदीसाठी ठेवल्याने त्या खरेदीचा कलही वाढत असल्याचे दिसून येत आहे.

फराळाबरोबर मिठाई खरेदीसाठी स्वीट मार्टमध्ये नागरिकांची गर्दी वाढत आहे. यंदा काजूकतली, रिअल फ्रूट बरोबरच शुगर फ्री

मिठाईलाही मागणी आहे. मिक्स मिठाई, काजू कमल भोग, शुगर-फ्री प्रकारची नवीन मिठाई उपलब्ध झाल्या आहेत. तसेच बाजारात फराळाचे तयार पदार्थ उपलब्ध असल्याने

फटाके खरेदीला प्रतिसाद

येत्या १० नोव्हेंबरपासून दिवाळीचा सण सगळीकडे साजरा केला जाणार आहे. पाच दिवस दिवाळीचा सण साजरा करण्यात येतो त्यामुळे नागरिकांमध्ये उत्साहाचं वातावरण असते. तसेच या सणानिमित्त बाजारपेठाही सजल्या आहेत. ग्राहकांची देखील विविध वस्तू खरेदीसाठी बाजारात लगबग पाहायला मिळत आहे. ठिकठिकाणी बाजारात फटाक्यांची दुकानं पाहायला मिळत आहे. यावर्षी फटाक्यांच्या किंमतीत ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाली असली तरी नागरिकांचा उत्साह मात्र कमी झालेला नाही.त्याकडेही ग्राहकांचा कल दिसत आहे.

पेण पोलिस वसाहतीचा झाला कोंडवाडा

गडब/सुरेश म्हात्रे

डोळ्यात अंजन घालून जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलिसांच्या वसाहतींना ग्रहण लागले आहे रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पोलिस वसाहतींची देखील तीच अवस्था आहे. पेण शहरातील फणस डोंगरी येथे असणाऱ्या पोलिस वसाहतीचा अक्षरशः कोंडवाडा तयार झाला आहे. ही वसाहत सुस्थितीत व्हावी किंवा त्या ठिकाणी नव्या इमारतीची निर्मिती व्हावी यासाठी येथील पोलिस प्रशासन हालचाली करण्यास तयार आहे. मात्र या फुटलेल्या काचा, वाढलेली झाडी झुडपे वसाहतींची देखभाल करण्याची ज्या आणि गवत या सर्व गोष्टींमुळे ही पोलिस सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जबाबदारी वसाहत नव्हे, तर हा कोंडवाडाच असल्याचे आहे त्या बांधकाम विभागाकडून या भास होत आहे. सन १९८८ - ८९ साली वसाहतीच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट बांधकाम झालेल्या या इमारतीला आज ३४ झाले नसल्याने पोलिस प्रशासनाला पुढील वर्षे पूर्ण झाली असून या वसाहती मधील प्रक्रिया करता येत नाहीत. त्यामुळे पेण तीन पैकी दोन इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट पोलिस वसाहतीच्या पुनर्बांधणीला झाले आहे,सार्वजनिक बांधकाम विभागाची कासव मात्र एका इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट गतीच जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे. पोलिस प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम मोडकळीस आलेला गेट, बैठ्या चाळीवरील विभागाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करुन कौलांची झालेली पडझड, अस्थिपंजर देखील दुर्लक्ष केले असल्याने या इमारतीची झालेल्या इमारती, इमारतींच्या खिडक्यांच्या बांधकामाची किंवा डागडुजी करण्याची

पुढील प्रक्रिया अडकून बसल्याने बांधकाम विभाग या वसाहतीकडे दुर्लक्ष का करत आहे हे न उलगडणारे कोडे होऊन बसले आहे.. या वसाहतींमधील एका इमारतीमध्ये काही कुटुंब

वास्तव करत असल्याने आम्ही ऑडिट केले नाही असे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे, मात्र ज्या इमारतीमध्ये नागरीक राहत असतात त्या इमारतीचे ऑडिट होत नसल्याचे न पटणारे उत्तर देऊन बांधकाम विभागाने आपण या वसाहतीबाबत किती उदासीन आहोत हे दाखवून दिले आहे.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालया तर्फे जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंढे यांचा सत्कार

लातूर ।प्रतिनिधी

भारतीय तंत्रज्ञान संस्था, कानपूरचा सत्येंद्र दुबे स्मृती पुरस्कार सत्येंद्र के. दुबे (बीटी/सीइ१९९४) यांच्या स्मरणार्थ त्यांच्या अनुकरणीय जीवनासाठी आणि सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचाराशी लढताना सर्वोच्च बलिदानासाठी स्थापित करण्यात आला. हा पुरस्कार लातूर जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंढे यांना नुकताच देण्यात आला. त्याबद्दल त्यांचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि महात्मा बसवेश्वर ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी प्राचार्य डॉ. काशिनाथ राजे आणि ॲड. धनंजय मिटकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा पुरस्कार आयआयटीच्या माजी विद्यार्थ्यांना दिला जातो. ज्यांनी मानवी मूल्याचे पालन करण्यासाठी सर्वोच्च व्यावसायिक सचोटी दाखवून स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले आहे. आयआयटी कानपूरच्या स्थापना दिनी म्हणजेच ०२ नोव्हेंबरला हा पुरस्कार दिला गेला. सोमय मुंडे हे आयआयटी मुंबईचे विद्यार्थी आहेत. ते त्यांच्या प्रामाणिक, कुशाग्र आणि धाडसी प्रतिमेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील मर्दीनटोला छत्तीसगड) सीमेलगत असणाऱ्या घनदाड जंगलाच्या परिसरात १३ नोव्हेंबर २०२१ला आपल्या तुकडीच्या जवानासोबत २६ नक्षलवाद्यांचा खात्मा केला.

त्यांच्या या पराक्रमाची दखल घेत भारत सरकारद्वारे दिला जाणारा पोलीस दलातील अत्यंत मानाचा शौर्य पुरस्कार राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्वांनी त्यांना दिवाळी आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या.

मैत्रा फाउंडेशनचा राज्यस्तरीय शिक्षण महर्षी पुरस्कार सोनाली दुधाने यांना जाहीर

दिंद्रुड (प्रतिनिधी)

संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या मैत्रा फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले असून मानाचा समजला जाणारा शिक्षण महर्षी पुरस्कार सोनाली गोवर्धन देखणे(दुधाने) यांना जाहीर झाला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, वडवणी येथील सोनाली गोवर्धन देखणे (दुधाने) या पिंपरखेड येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या शैक्षणिक सेवेत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शालेय गुणवत्ता वाढवली आहे त्यामुळे त्यांचे शैक्षणिक कार्य बघून मैत्रा फाउंडेशनचा मानाचा समजला जाणारा शिक्षण महर्षी पुरस्कार सोनाली दुधाने यांना जाहीर झाला आहे.बीडच्या मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक द.ल.वारे,हर्षा ढाकणे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड,उद्धव बडे यांनी सोनाली दुधाने यांची निवड केली आहे.त्यांच्या या निवडीमुळे सोनाली दुधाने

यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून पिंपरखेड शाळेचे मुख्याध्यापक श्री कदम सर,जोशी सर,साळुंखे सर, दिघे सर,वाघमारे सर,साप्ते सर या सर्वांनी सोनाली दुधाने यांचे विशेष कौतुक केले आहे.

मा,श्री भास्करजी आंबेकर साहेब(शिवसेना जिल्हाप्रमुख जालना) यांनी बीड येथे आल्ये असता आम्हचे जनसंपर्क कार्यालय द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड येथे संधीच्छा भेट दिल्याप्रंसंगी त्यांचं स्वागत करुन प्रभागातील विकास कामांची पाहणी करताना मी व श्री परशुराम (भैय्या)गुरखुदे श्री वैभव वद्ये साहेब श्री कचरु(आन्ना) जगतात व द्वारकाधीश मित्र मंडळ बीड

डॉ. संतोष मुंडे यांनी दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे घेतले कामकाज समजुन

मुंबईच्या कार्यालयात अनेकांनी केले स्वागत, दिव्यांगांसाठी आयुष्य खर्ची घालणार - डॉ. संतोष मुंडे

मुंबई (प्रतिनिधी)

दिव्यांगांच्या सेवेसाठी अभियानचे उपाध्यक्ष हे पद माझ्यासाठी खुप महत्वाचे आहे. पदाला न्याय देण्यासाठी मी वचनबद्ध असुन दिव्यांगांसाठी आयुष्य खर्ची घालणार असल्याचे प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी केले. मुंबईच्या कार्यालयात अधिकारी, कर्मचारी व दिव्यांगांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

डॉ. संतोष मुंडे यांनी आज मुंबई येथे दिव्यांग स्वतंत्र मंत्रालय मित्तल टॉवर नरिमन पॉईंट येथे ऑफिसला भेट देऊन कामकाज समजून घेतले. यावेळी दिव्यांग विभागाचे प्रधान सचिव अभय महाजन, आयुक्त घोडके यांनी त्यांचे स्वागत करून कामकाजाचे स्वरूप व उद्दिष्टांबाबत सविस्तर माहिती दिली. सातत्याने ना. धनंजय मुंडेंच्या यांच्या नेतृत्वाखाली समाजातील दिव्यांग, निराधार, विधवा आदी वंचित घटकांना न्याय मिळावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आ. बच्चूभाऊ कडू यांनी माझ्यावर एवढी मोठी जबाबदारी टाकली असल्याचे सांगुन आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळत असल्याने आपण समाधानी आहोत असेही ते म्हणाले. गेल्या पंधरा वर्षापासुन मी डॉक्टर व्यवसायाच्या माध्यमातुन सामाजिक कार्यात आहे. दिव्यांगांसाठी काम करताना अनेक अडचणी आल्या पण शेवटच्या दिव्यांगाला न्याय मिळावा ही आपली भूमिका असुन त्यासाठीच आपण काम करत आहोत. नवीन जबाबदारीमुळे आणखी कामाची व्याप्ती वाढून मला जास्तीत जास्त दिव्यांगांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे असे सांगुन या कामामध्ये या विभागातील सर्वांनी सहकार्य करावे

गोमातेच्या सात्विक गुणामुळे मानवी जीवन समृद्ध होते - राजेंद्र मस्के

कै.तुकाराम गुरुजी गो शाळेत वसू बारस उत्साहात साजरी..!

बीड (प्रतिनिधी)

आज गोवत्स द्वादशी अर्थात वसू बारस. आजपासून दिवाळी सुरू होते. भारतीय संस्कृतीत गाईला मातेची स्थान असून, कृतज्ञतेच्या भावनेतून गाय आणि वासरू यांची पूजा केली जाते. प्रेम आणि वातसल्याचे प्रतीक वसू बारस निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा सौ. जयश्रीताई राजेंद्र मस्के यांच्या हस्ते कै. तुकाराम गुरुजी गोशाळेत गाय वासरांचे विधिवत पूजन,व गायींना गोग्रास देऊन, वसू बारस उत्साहात साजरी केली. यावेळी सांस्कृतिक प्रकोष्ट चे प्रमोद रामदासी, मारुतीराव तिपाले, मस्के परिवार व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

गोवंशामुळे शेतकरी बांधवांना शेती करण्यासाठी कष्टाळू बैल हा प्राणी मिळाला. जोडधंदा म्हणून आर्थिक उत्पन्न कमावता येते. दुधामुळे समाज बलीष्ट होतो. शेण, गोमूत्र यामुळे जमीन कसदार करता येते. गाईच्या अंगी सर्व काही सद्गुण आहेत. तिच्या सहवासामुळे निश्चित परिवर्तन आणि प्रगती होते. जेथे गोमातेचे संरक्षण, संवर्धन केले जाते. गोमातेला पूज्य भाव दिल जातो. तेथील समाज आणि राष्ट्र भरभराटीस जातो असा आजवरचा मानवी इतिहास आहे. म्हणूनच भारत देशात अनेक राज्यामध्ये गोमातेचे पूजन करून कृतज्ञता भाव व्यक्त केला जातो. प्रत्येकाने गोमातेचे रक्षण करून आदर राखला पाहिजे. गोमातेचे जीवन खऱ्या अर्थाने परोपकारी असून, तिच्या अस्तित्वामुळे मानवी जीवनाला समृद्धी लाभते. अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी यावेळी दिली.

पिंपळनेर जिल्हा परिषद शाळेच्या शतकपूर्ती निमित्त माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन!

पिंपळनेर (प्रतिनिधी)

पिंपळनेर येथे १९२३ रोजी स्थापन झालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेला शंभर वर्षे पूर्ण होत असून त्या निमित्ताने पिंपळनेर परिसरातील माजी विद्यार्थी संघाने दीपावली नंतर दि.१७ नोव्हेंबर रोजी शतकपूर्ती सोहळ्याचे आयोजन केले असून ग्रंथदिंडीने या कार्यक्रमाची सुरुवात होणार असून या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ / मुंडे,पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब सीईओ अविनाश पाठक साहेब , शिक्षण अधिकारी श्रीकांत कुळकर्णी सह क्रीडाधिकारी उपस्थित राहणार असून दुपारी विशेष महिलांकरिता वसंत हंकारे याच बाप समजावून घेताना या विषयावर व्याख्यान तर ४ च्या सत्रात माजी विद्यार्थ्यांचा जुन्या आठवणींना उजाळा देणारा सवांद मित्र मेळावा होणार असून रात्री गणेश शिंदे याचं मित्र समजावून घेताना या विषयावर व्याख्यान होत आहे

या भव्य दिव्य कार्यक्रमास उपस्थित राहून या शतकपुर्ती सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे आवाहन जिल्हा परिषद माजी विद्यार्थी संघ यांनी केले आहे

माजी विद्यार्थी संघाकडून मदतीचे आवाहन

ज्या चार भिंतीत १० पिढ्या घडल्या त्या ज्ञानमंदिराला १०० वर्षे होत आहेत.आम्हा सर्वांना घडवताना ज्या शाळेने संस्कार दिले आणि आम्हास घडविले त्या शाळेची शकपूर्ती दैदिप्यमान करायची आहे त्याकरिता खर्च देखील तेवढाच मोठा असणार आहे शक्य तेवढा निधी आपणा सर्वांना मिळून जमा करायचा आहे ९५६१४३०६७१ दादाराव इंगोले या नंबरवर फोन पे/ गुगल पे/ पेटीएम/ करू शकता

सर्पराज्ञीत वसुबारस मोठ्या उत्साहात साजरी दिन दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी

वन्यजीवांचे उदरभरण करणाऱ्या गाई विषयी कृतज्ञता केली व्यक्त

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रामध्ये जखमी, आजारी किंवा आईपासून दुरावलेल्या वन्यजीवांची सेवा सुश्रुषा केली जाते. सर्पराज्ञी आतापर्यंत जवळपास सतरा हजार वन्यजीवांना नवजीवन दिलेले आहे.दिवाळीचे प्रथम पर्व म्हणजेच वसुबारस सोहळा साजरा करून वन्यजीवांचे भरण पोषण करण्यात वाटा असलेल्या दोन गाईंची व तिच्या वासरांचीप्रति कृतज्ञता व्यक्त केली.जखमी ,आजारी व मातृत्वापासून पुरवलेल्या चिंकारा,काळवीट, ससे,रानमांजर, जावडी मांजर,उदमांजर आदी शंभरएक वन्यजीवांच्या पिल्लांना गौरी व दुर्गा या दोन गाईं मुळे जीवदान मिळालेले आहे. या दोन गाई वन्यजीवांच्या पिल्लांसाठी खऱ्या अर्थाने संजीविका ठरलेल्या आहेत.या गाईनविषयी कृतज्ञता व्यक्त करत सर्पराज्ञीत मोठ्या आनंदाने वसुबारस साजरी करण्यात आली.सिद्धार्थ सोनवणे व सृष्टी सोनवणे यांनी आपल्याजवळ असलेल्या दोन गाईंना गौरी आणि दुर्गा यांना अभंगस्थान घालून त्यांची यथासांग पूजा करून कृतज्ञता व्यक्त केली.या दोन गाई ह्या मातृत्व हिरावलेल्या वन्यजीवांच्या पिल्लांची आई बनल्याचे सांगितले.या गाई सर्पराज्ञीला ज्यांनी दान स्वरूपात दिल्या त्या क्षितिज हिर्लेकराना देवमाणूस म्हणून संबोधने गैर नसल्याचे सांगत सिद्धार्थ सोनवणे व सृष्टी सोनवणे दापत्य विसरले नाहीत

आज आदरणीय जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वात कुरेशी मोहल्ला या ठिकाणी अत्याधुनिक यंत्राच्या सहाय्याने रस्त्या वरील धुळीची स्वच्छता व कुरेशी मोहल्ला परिसरातील दर्गाह परिसराची स्वच्छता करून घेतली यावेळी स्वतःहून दोन ते तीन तास उभे राहून कर्मचाऱ्यांना दिशा निर्देश देवून अतिशय चांगल्या प्रकारे काम पूर्णत्वास घेवून जात असताना युवा नेते वाजेद जावेद कुरेशी व परिसरातील ज्येष्ट नागरिक ही उपस्थित होते

आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषिदूतांनी दिली तुळजापूर येथील कोरडवाहू साळ संशोधन केंद्राला भेट

बीड (प्रतिनिधी)

आदित्य कृषि महाविद्यालयातील चौथ्या वर्षातील कृषि कार्यानुभवचे कृषिदूत प्रफुल देवगडे , राम गडदे , महेश कवडेवार , अमोल चव्हाण , ज्ञानेश्वर गौरकर , भागवत शिंदे , विशाल गंद्रेवाड , उमेश गायकवाड यांनी तुळजापूर येथील कोरडवाहू साळ संशोधन केंद्र ला भेट दिली आणि तेथे विविध प्रात्यक्षिक करण्याचे प्रशिक्षण घेतले.

यावेळी कृषिदूतांना मार्गदर्शन करण्यासाठी कोरडवाहू साळ संशोधन केंद्र तुळजापूर येथील वरिष्ठ प्रभारी अधिकारी लतीफ चौधरी हे उपस्थित होते. तसेच कृषी सहाय्यक विभागाचे महेश रूपदास सर यांनी यावेळी कृषिदूतांना विविध प्रात्यक्षिकांबद्दल सखोल ज्ञान दिले. त्यानंतर कृषिदूतांनी ठरल्याप्रमाने एका आटवड्यात प्रत्येकी दिवशी वेगवेगळ्या युनिट ला भेट दिली तसेच कृषिदूतानी शेतात असणाऱ्या पीकांबद्दल सखोल माहिती प्राप्त केली. तसेच कृषिदूतानी

संशोधन केंद्राने विकसित केलेल्या जाती टी जे पी ४८, तेरणा या बदल संपुर्ण महिती जाणून घेतली तसेच दिलीप रसाळ प्रयोगशाळा सहाय्यक व माणिक बालाटकर कर्मचारी याचे कृषिदूतांना भरपूर मार्गदर्शन लाभले व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख श्री. धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची निवड

राज्यस्तरीय बैठकीत नवनियुक्त प्रदेश, विभागीय कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

छ.संभाजीनगर (प्रतिनिधी)

मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य कक्षाच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी नगर येथील जिजाऊ मंदिर, राजर्षी शाहू भवन, म्हाडा कॉलनी येथे दि.०९ नोव्हेंबर रोजी मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय बैठक आणि नवनियुक्त प्रदेश कार्यकारणी व विभागीय कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छ.संभाजी नगर चे जेष्ठ साहित्यिक डॉ.विजय पाथ्रीकर, बीड च्या जेष्ठ साहित्यिक डॉ.दीपाताई क्षीरसागर, छ.संभाजी नगर चे पोलीस उपनिरीक्षक शिवश्री. मधुकर मोरे यांची उपस्थिती होती. जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे प्रदेशअध्यक्ष डॉ.सुभाष बागल, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.सतीश तराळ हे अध्यक्षस्थानी तर प्रदेश संपर्कप्रमुख डॉ. श्यामसुंदर महाराज सोन्नर, प्रदेश महिला संघटक प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे, प्रदेश महिला संपर्कप्रमुख डॉ.तेजस्विनी डांगे, मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवश्री. संदिपान जाधव, विभागीय अध्यक्ष शिवश्री. धनंजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी नियुक्ती करण्यात आली. मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री. इंजि.विजयजी घोगरे, मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्या शुभहस्ते डॉ. दीपाताई क्षीरसागर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ.दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, वारकरी संप्रदायातील संत तुकाराम हे थोर संत होते. त्यांचे महात्म्य आणि त्यांची भक्ती दोन्हीही अजरामर झाले. संत तुकोबा पुरोगामी विचाराचे होते. त्यांचे विचार हे सामाजिक आणि वैयक्तिक उन्नती घडवून आणणारे होते. त्यांनी त्याकाळात आपल्या अभंगातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे विचार मांडले. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. त्याकाळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनातून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले.

संत तुकोबारायांनी विष्णुमय जग वैष्णवांचे धर्म भेदाभेदभ्रम अमंगळ या अभंगातून हे जग विष्णुमय आहे, वैष्णव हा एकच धर्म सर्वत्र आहे. माणसा-माणसांमध्ये भेद करने ही अमंगल बाब आहे. भक्तांनी भगवंताचे श्रवण, चिंतन करून आपले हित साधुन घ्यावे. आपल्या हातून कोण्याही जीवांचा मत्सर घडू नये, हीच खरी ईश्वर भक्ति असल्याचे सांगितले. तुकोबा म्हणतात, जे परिस्थितीने व सांसारिक तापाने रंजले गांजलेले लोक आहेत, त्यांना जो आपले म्हणतो. तोच खरा साधू असल्याचे समजावे. समाजातील व्यर्थ गोष्टी, प्रथा आणि परंपरा यांवर त्यांनी परखड भाषेत टीका केली. ईश्वर भक्तीसाठी भक्तीचा सुगम मार्ग त्यांनी दाखवला. तुकाराम महाराज हे आपल्या कीर्तनातून जनजागृती करत असत. त्यांचे अभंग आणि कीर्तने ही सर्व साक्षात्कारी अनुभवातून अवतरलेली होती.

तुकोबाराय यांनी अंधश्रद्धा तर दूर केलीच परंतु अध्यात्म बरोबर सामाजिक एकतेचा संदेश दिला असे डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले.

तसेच यावेळी त्यांनी जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी नियुक्ती केल्याबद्दल आभार मानले व जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या कार्यामध्ये सक्रिय सहभागी होऊन या कक्षाच्या विचार - कार्याचा प्रसार व प्रचार शेवटच्या घटकांपर्यंत घेऊन जाणार असल्याचे सांगितले.

लिंबागणेश गावास घंटा गाडी खरेदी करण्यासाठी मंजुर झालेला निधी गेला कुठं ?

घंटागाडी फक्त कागदोपत्रीच

लिंबागणेश । हरिओम क्षिरसागर

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश हे गाव जिल्हा परिषद सर्कल चे गाव असून त्या गावची लोकसंख्या ३००० ते ४००० हजाराच्या आसपास आहे. गावं मोठे असुन ते तीर्थक्षेत्र देखील आहे. गावासाठी भरपूर निधी येत असतो मात्र गावातील पुढारी तो निधी कसा खाता येईल यातच मग्न असतात. मात्र गावासाठी प्लास्टिक कचराकुंड्या खरेदी करणे तसेच घंटागाडी खरेदी करणे यासाठी निधी मंजूर झालेला असून गावात धड एक प्लास्टिकची कुंडी देखील नाहीये मात्र घंटागाडी तर लांबच . शासकीय पोर्टल ई -ग्रामस्वराज च्या माध्यमातून पुढील मंजूर झालेला निधी असा दाखवत आहे . १) प्लास्टिक कचराकुंड्या खरेदी करणे यासाठी ९० हजार रुपये तर २) घंटागाडी खरेदी करण्यासाठी ३ लाख १६ हजार ३१८ रुपये इतका खर्च दाखवत आहे. मग हा आलेला निधी गेला कुठं ? असा प्रश्न ग्रामस्थांना पडलेला आहे . कारण गावात तसेच मुख्य चौकात कचरा व्यवस्थापनाची कुठलीच सोय नसल्याने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कुठलीच सोय नसल्याने ग्रामस्थ घरातील कचरा रस्त्यावर टाकत आहेत त्यामुळे अतिशय घाणीचा सामना करावा लागत आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे आ.सुरेश धस यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट

आष्टी (प्रतिनिधी)

मराठा आरक्षण प्रश्नावर लढणारे मराठा समाजाचे लढवय्या नेतृत्व मनोज जरांगे पाटील यांना आठ दिवसांच्या उपोषणानंतर छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी रुग्णालयामध्ये उपचार सुरू असल्यामुळे गुरुवार दि.९ नोव्हेंबर रोजी आ.सुरेश धस यांनी त्यांची रुग्णालयामध्ये जाऊन भेट घेतली.

विधानपरिषदेचे आ.सुरेश धस यांनी छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी हॉस्पिटलमध्ये मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असल्याचे पाहून आनंद झाला असल्याची भावना भेटी दरम्यान आ.धस यांनी व्यक्त केली.

मनोज जरांगे पाटील आणि सकल मराठा समाजाने मागणी केल्याप्रमाणे आणि सरकारने शब्द दिल्याप्रमाणे मराठा आरक्षणासाठी गठित केलेल्या समितीला नोंदणी कार्यालय, भूमिअभिलेख कार्यालय व महसूल कार्यालयांमध्ये मराठा समाजाच्या 'कुणबी' म्हणून नोंदी आढळत आहेत ही मराठा समाजाच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. प्रकृतीची विचारपूस करून मराठा समाजाच्या आरक्षणाविषयी सविस्तर चर्चा करत जरांगे पाटील यांना आ.सुरेश धस यांनी काळजी घेण्याची विनंती केली.

शिरूर कासार येथे २.६६ कोटी रू.किमतीच्या दुय्यम निबंधक कार्यालय इमारत बांधकामास मंजुरी

आ.सुरेश धस यांचे मागणीने झाले मंजूर

आष्टी (प्रतिनिधी)

आ.सुरेश धस यांनी ०४ जुलै २०२३ रोजी महसूल मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे बीड जिल्ह्यातील पाटोदा आणि शिरूर कासार येथे दुय्यम निबंधक कार्यालय नवीन इमारत बांधकाम मंजुरी मिळावी अशी मागणी केली असता त्यावर सदरील प्रस्ताव तात्काळ मान्य करा असा आदेश दिल्यानंतर ०८ नोव्हेंबर २०२३ रोजी महसूल विभागाच्या शासन निर्णयाद्वारे शिरूर कासार येथील दुय्यम निबंधक कार्यालय नवीन इमारत बांधकामास मंजुरी मिळाली आहे.

शिरूर कासार तालुक्याच्या दुय्यम निबंधक कार्यालय इमारतीसाठी आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने व सततच्या पाठपुराव्यामुळे या नवीन इमारत बांधकामासाठी एकूण ०२ कोटी ६६ लाख २३ हजार रु.किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानुसार या ठिकाणी स्वतंत्र, आधुनिक सोयी सुविधांयुक्त असे दुय्यम निबंधक कार्यालय कार्यान्वित होणार आहे.

यामुळे तालुक्यातील नागरिकांची मोठी सोय होणार असून यामुळे शिरूर कासार तालुक्यातील नागरिकांमध्ये आनंद व्यक्त करत आ.सुरेश धस यांचे आभार व्यक्त केले आहेत.

वस्तीगृहात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची आत्महत्या

अंबाजोगाई तालुक्यातील घटना

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगई स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या वस्तीगृह विभागातील तृतीय श्रेणी कर्मचारी वैजनाथ अनंत काळे यांनी . महाविद्यालयाच्या पीजी बॉईज वस्तीगृहातील एका खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी घडली.अधिक माहिती अशी की, वैजनाथ अनंत काळे हे गेली २० ते २५ वर्षापासून अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तृतीय श्रेणी कर्मचारी या पदावर कार्यरत आहेत. सध्या त्यांची ड्युटी पी .जी .वस्तीगृह विभागात होती.

वैजनाथ काळे हे आज सकाळी नेहमीप्रमाणे ड्युटी साठी वैद्यकीय

महाविद्यालयाच्या परिसरात आले. आपल्या सहकाऱ्यांशी गप्पा मारून ते वस्तीगृहाकडे गेले. वस्तीगृहात कार्यरत असलेल्या इतर कर्मचाऱ्यांची त्यांनी गप्पा मारल्या आणि फ्रेश होण्यासाठी ते वस्तीगृहाच्या रूममध्ये गेले.

बराच वेळ झाला तरी ते आले नाहीत . हे पाहून इतर कर्मचाऱ्यांनी त्या रूमचा दरवाजा उघडला असता त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. सदरील घटनेची माहिती संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकारी व सुरक्षा विभागाला दिली. याप्रकरणी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मात्र मयत वैजनाथ काळे यांनी आत्महत्या नेमकी कोणत्या कारणामुळे केली. हे अजून स्पष्ट झाले नाही.

बबन गिते यांनी केले फुलचंद कराड यांच्या सांत्वन

परळी (प्रतिनिधी)

भाजपचे ज्येष्ठ नेते भगवान सेने चे सरसेनापती फुलचंदराव कराड यांच्या मुलाचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. आज महाराष्ट्र राज्य चे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) उपाध्यक्ष बबन गिते यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन कराड कुटुंबाचे सांत्वन केले.

फुलचंद कराड यांचा मुलगा राजपान कराड यांचे दि. ३१ ऑक्टोबर रोजी दुखद निधन झाले. आज बबन गिते यांनी कराड यांच्या निवासस्थानी जाऊन कराड कुटुंबाचे सांत्वन केले. त्यांनी यावेळी राजपान कराड यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी अनेक आठवणी सांगितल्या. यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष बबन गिते महादेव गिते, धीरज भराडीया यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

बेरळी बुद्रुकचे चेअरमन रामराव पाटील इंगोले यांचे निधन !

मुखेड ।प्रतिनिधी

बेरळी बुद्रुक सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तथा वारकरी संप्रदायाचे जेष्ठ वारकरी रामराव सिताराम पाटील इंगोले वय ९५ वर्ष यांचे आज दुपारी दुःखद निधन झाले.स्वर्गीय रामराव पाटील इंगोले हे बेरळी येथील ज्येष्ठ नागरिक तथा वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ वारकरी म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. बेरळी बुद्रुक येथील सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी कार्य केले. आज दुपारी त्यांचे वर्धापकाळाने दुःखद निधन झाले.उद्या १० नोव्हेंबर रोज शुक्रवार दुपारी एक वाजता बेरळी बुद्रुक येथे स्वर्गीय रामराव पाटील इंगोले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. स्वर्गीय रामराव पाटील इंगोले यांच्या पश्चात किशनराव इंगोले, आनंदराव इंगोले असे दोन मुले, सुना,६ मुली नातू - नातवंडे असा मोठा परिवार आहे. रेशन विभाग मुंबईचे उपायुक्त श्री मधुकरराव शेषराव बोडके पाटील यांचे ते आजोबा होत.

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय केज येथे कायदेविषयक जन जागरण शिबीर संपन्न

केज ।प्रतिनिधी

दि.०९-११-२०२३ रोजी तालुका विधी सेवा समिती व वकील संघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने कायदे विषयक जनजागृती शिबीराचे आयोजन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,केज येथे दुपारी २-०० वाजता करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.कुणाल जाधव होते. कार्यक्रमास दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस.व्ही.पावसकर मॅडम,सह दिवाणी न्यायाधीश श्री.एन.डी. गोळे,दुसरे सह दिवाणी न्यायाधीश श्री.पी.व्ही. पाटील,तिसरे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.टी. जगताप मॅडम,चौथे सह दिवाणी न्यायाधीश श्री. के.एन.निवडंगे,वकील संघाचे अध्यक्ष अड.श्री. एम.एस.लाड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड.एस.व्ही मिसळे यांनी केले.कार्यक्रमाची प्रस्तावना अँड.डी.डी. सपाटे यांनी केली.यावेळी अड.डी.टी सपाटे यांनी आपल्या प्रास्ताविकात नालसा स्किम विषयी माहिती सांगून सर्व परिसरात शासकीय कार्यालयात स्वच्छता ठेवण्याचे आवाहन केले चौथे सह दिवाणी न्यायाधीश श्री.के.एन. निवडंगे यांनी एडीआर पध्दती आणी त्याचे फायदे याविषयी सविस्तर अशी माहिती उपस्थितांना सांगितली.दुसरे सह दिवाणी न्यायाधीश श्री. पी.व्ही.पाटील यांनी राष्ट्रीय शिक्षण दिनाविषयी माहिती सांगितली.ते म्हणाले की,दि.११ नोव्हेंबर राष्ट्रीय शिक्षण दिन हा दिवस भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती निमित्त साजरा केला जातो,देशातील विदयार्थ्यां साठी हा दिवस महत्त्वाचा आहे.त्यामुळे या दिवशी विदयार्थी विविध खेळ, स्पर्धांच्या माध्यमातून हा दिवस साजरा करतात. सोबतच मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या आठवणींना उजाळा दिला यावेळी सहदिवाणी न्यायाधीश श्री.एन.डी. गोळे यांनी नागरिकांची मुलभूत कर्तव्ये याबाबत उपस्थितांना माहिती सांगितली.प्रमुख दिवाणी न्यायाधीश एस.व्ही. पावसकर मॅडम यांनी राष्ट्रीय विधि सेवा दिना बाबत सविस्तर अशी माहिती सांगितली.त्या म्हणाल्या की,९ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय विधि सेवा दिन म्हणून साजरा केला जातो.कायदेशीर सेवांनुसार विविध तरतुदी बाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे तसेच समाजातील दुर्बल घटकातील लोकांना विनामुल्य,कुशल तसेच कायदेशीर सेवा पुरविणे हे या दिवसाचे मुख्य उद्दीष्ट आहे.आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.कुणाल जाधव यांनी राष्ट्रीय शिक्षण दिन,राष्ट्रीय विधि सेवा दिनाबाबत

माहिती सांगून वैकल्पीक न्याय निवारण पध्दती तसेच विधी सेवा मार्फत नवीनच सुरू करण्यात आलेल्या संरक्षण पॅनेल विषयी उपस्थित पक्षकार, विधिज्ञ यांना उपयुक्तअशी माहीती सांगितली.तसेच ते म्हणाले की,आजकाल झाडांची कत्तल खूप मोठया प्रमाणात होत असून यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. ज्यामुळे मनुष्याचे आरोग्य धोक्यात आले आहे.तसेच आजकालच्या युवकांनी व्यसनाधिनतकडे न जाता आपली उत्तरोत्तर प्रगती कशात आहे हे समजून आपली व आपल्यादेशाची प्रगती करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थितां ना केले.कार्यक्रमाच्या शेवटी अड.व्ही.बी.पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास विधिज्ञ पक्षकार यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने केज तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा म्हणून तहसीलदार यांना निवेदन

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा या मागणी साठी तसेच १००% पिकांचे नुकसान गृहीत धरून पिकविमा अनुदाना पैकी २५ टक्के अग्रीम अनुदान तात्काळ शेतक-यांच्या खात्यावर जमा करावा, कृषीसेवा केंद्रावर राज्य शासनाने लावलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात अशा विविध मागण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने केजचे तहसीलदार श्री.अभिजीत जगताप यांना निवेदन दिले आहे.या निवेदनात म्हटले आहे की,यंदा शेतकरी वर्गाला निसर्गाने साथ न दिल्याने हवालदिल झालेले असून मागील काळात खूप कमी पाऊस पडला आहे.केज तालुक्यात दुष्काळ का जाहीर केला नाही? केज तालुक्यातील सर्व नदी, नाले कोरडे पडले आहेत व लोकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. केज तालुक्यात एकही लहान मोठा तलाव भरलेला नाही व तसेच केज तालुक्यात महत्वाचे असणारे मांजरा धरणात (केज तालुक्यासाठी संजीवनी असलेले) फक्त ३०% पाणीसाठा उपलब्ध आहे व तसेच आज कुठे तरी थोडयाफार प्रमाणात बोअरवेलला पाणी आहे. ते कुठपर्यंत पुरेल याचा तरी अंदाज घेतला पाहिजे व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आम्ही सर्व कार्यकर्ते निवेदन देत आहोत की, केज तालुका

संपूर्ण दुष्काळग्रस्त जाहीर करावा व तसेच शेतक-यांना शेतीसाठी लागणारे बी-बियाणे विक्रेते यांना राज्य शासनाने लावलेल्या जाचक अटी तत्काळ रद्द करण्यात याव्यात व तसेच शेतक-यांच्या शेती पिकांचे १००% नुकसान गृहीत धरून पिक विमा पैकी २५ टक्के अग्रिम पीकविमा व दुष्काळ अनुदान शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे .

बंडू पाटील वडजे यांची भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

लोहा ।प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्याचे लोकप्रीय खासदार आदरणीय प्रतापरावजी पाटील चिखलीकर साहेब यांचे खांदे समर्थक म्हणून लोहा तालुक्यामध्ये ओळख असलेले तरुण व समाजामध्ये सर्वांशी आपुलकीचे व जिव्हाळ्याचे संबंध जोपासणारे युवकांचा बुलंद आवाज म्हणून परिचित असणारे लोहा शहरातील बंडू पाटील वडजे (बॉस) यांची भाजपा युवा मोर्चा नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वरशव होत आहे व चिखलीकर साहेबांबद्दल कार्यकर्ते कृतज्ञता व्यक्त करत आहेत की एका सच्चा कार्यकर्त्यांला या पदावर

काम करण्याची संधी प्राप्त करून दिली.

विश्व हिंदू परिषदेचे तालुका अध्यक्ष व पत्रकार अंबादास पाटील पवार पत्रकार सुनील पाटील चव्हाण संग्राम पाटील चव्हाण व मराठी पत्रकार संघाच्या वतीने यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या

गंगाबाई पांडुरंगराव जामगे यांचे वृध्दापकाळाने निधन

लोहा ।संग्राम चव्हाण

तालुक्यातील शिवणी जामगा येथील वयोवृद्ध जेष्ठ महिला गंगाबाई पांडुरंगराव जामगे यांचे काल दिनांक ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता वयाच्या ७५ व्या वर्षी नि १धन झाले , त्याच्या

पश्चात तिन मुली, एक मुलगा, नातु , पनतु असा मोठा परिवार असुन त्याच्या पर्थीवदेहावर आज १० नोव्हेंबर शुक्रवारी सकाळी ११ वाजता शिवणी जामगा येथील स्मशान भुमित अत्यंसंस्कार करण्यात येणार आहेत,पत्रकार गणपत पाटील यांनी यांच्या त्या आई आहेत.

एक पणती व्यसनमुक्तीसाठी

देशाची यूवा पिढी व्यसनमुक्त राहावे, व युवकांनी व्यसनापासून दूर राहावे म्हणून या दिवाळीत 'एक पणती व्यसनमुक्तीसाठी' लावून स्वतःचे व राष्ट्राचे हित जोपासावे. एक पणती लाखो पणत्यांना प्रज्वलित करू शकते. आज अनेक तरुण बांधव व्यसनाच्या आहारी जात आहेत. या व्यसनाने आपला जीव गमाऊ शकतो. आपल्या कुटुंबात आपले अस्तित्व खूप मोठे आहे. आज आपल्या देशात नवीन पिढीत प्रत्येकाला साधारणता एक किंवा दोनच अपत्य आहेत. त्यात पण एक मुलगा व एक मुलगी... मुलांचे व्यसनाकडील वाढते प्रमाण पाहता होणारा कर्करोग सारखा महाभयंकर आजार आपला जीव घेऊ शकतो.आपले अस्तित्व ओळखून व्यसन करणाऱ्या सर्व बांधवांनी या दिवाळीत एक पणती व्यसनमुक्त होण्यासाठी लावावे, व व्यसनाला पूर्णविराम द्यावे.

व्यसन माणसाच्या आयुष्याचा नाश करते. परिवारांच्या समाजातील आपल्या आस्तित्वाला अधोगतीला नेते. व्यसनमुक्त राष्ट्रनिर्मितीसाठी समाजातील चांगल्या व्यक्तीने पुढाकार घेऊन नवीन पिढीला व्यसनमुक्त व्यसनापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करावा. अनेक सामाजिक संस्था या कार्यात कार्य करीत आहेत.येणारी पिढी व्यसनमुक्त घडविण्यासाठी सर्वांनी पुढे येऊन सहकार्य करावे.

दिवाळीच्या सणात अंगणात, सार्वजनिक ठिकाणी पणती लावून व्यसनमुक्त आणि आरोग्यसंपन्न समाजासाठी प्रार्थना करावे.

मार्गदर्शनपर बोध युवकांना देताना
सांगू कहाणी व्यसनाच्या नुकसानीची
आपली शारीरिक हानी टाळण्यासाठी
लावूया एक पणती व्यसनमुक्तीची

नवतरुण युवकांना मार्गदर्शनाची आवश्यकता असते.त्यांना योग्य वळण लावणे कुटुंबाप्रमाणे शिक्षक व समाज ही महत्त्वाची भुमिका बजावत असतात.तरीही सोशल मिडियाच्या जाहिराती व संगत गुणामुळे मुले बिघडतात. अनेक सिने आभिनेतेच्या मुलाचे प्रकरण आपण ऐकुण आहात.नवीन पिढी व्यसनाच्या आहारी जात असल्याने जर त्यांना वेळीच योग्य मार्गदर्शन मिळाल्यास नक्कीच त्याच्यांत सुधारणा होऊ शकते. याची जाण व भान ठेवून समाजातील सदविवेक बुद्धीच्या लोकांनी नवतरुणांना याच वेळेस आवरलं पाहिजे. होणाऱ्या नुकसानीची जाणीव करून दिली पाहिजे. म्हणूनच यावेळी व्यसनमुक्त होण्यासाठी एक पणती व्यसनमुक्तीसाठी दिवाळीत दीप प्रज्वलित करून निर्धार घेऊया, उज्वल भारत व्यसनमुक्त घडविण्याचा सर्वांनी संकल्प करु या!

सवय झाली मजला अशी
की दूर तू जाता मला मी ना कळे
गंध तुझा सुवासिकता असा
कळते रे मला ही माझाच देह जळे

असे धुर काढून स्वतः सोबत इतरांचाही देह झिजवला जातो.धूम्रपान आरोग्यास घातक आहे ही गोष्ट नेहमी आपण ऐकत असतो.भारतात विडी, सिगारेट, सिगार, चिरुट, हुकली, चिलीम,ड्रग्ज आणि हुक्का अशा विविध प्रकारात तंबाखू सेवन केले जाते. त्याशिवाय गुटखा, तपकीर,तंबाखू असलेल्या टूथपेस्ट यातून तंबाखूचा वापर केला जातो. तपकिरी चे नाकाद्वारे सेवन केले जाते,तर बजर तपकिरी हिरड्यांना लावली जाते. मशेरी तंबाखूपासून त्याची पावडर दंतमंजन म्हणून वापरले जाते.

भारतात ५४टक्के बीडीच्या स्वरूपात तर १०टक्के सिगारेटच्या स्वरूपात धूम्रपान केले जाते. भारतात रोज एक कोटीपेक्षा जास्त सिगारेट पासून धूम्रपान केले जाते.ओढुन बिडी नको काढू,असा तोंडातून रे धूर!नाहीतर या जगापासून,जाशील तू लवकर दूर!

भारतात तंबाखू सेवनाचे प्रमाण अधिक आहे. २०१२ झाली महाराष्ट्र शासनाने गुटख्यावर बंदी आणली प्रत्येक सिगारेट जीवनातील सात मिनिट कमी करते.याचबरोबर पालकांच्या धुम्रपानामुळे लहान मुलांना श्वसनाचे आजार होण्याची शक्यता सहा पट अधिक असते. हेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक बिडीच्या सिगारेटच्या पाकिटावर स्मोकिंग इज इन्जुरस टू हेल्थ असा इशारा दिलेला असतो. तरीपण आवर्जून सिगारेटचे सेवन केले जाते. त्याचप्रमाणे धूम्रपानामुळे सावकाश व वेदनादायी मृत्यू ओढवला जातो. त्याच्या विळाख्यात मनुष्य सापडतो. आपल्या देशात सर्वात जास्त तोंडाचे कर्करोगाचे मरीज आढळतात. त्यात अर्धे लोक एका वर्षातच मृत्युमुखी पडतात.अनेक किशोरवयीन मुले असाच व्यसन प्रवास करतात. सिगरेटची नशा करतात.१५-१६ वर्षांच्या मुलांपासून कुणालाही याचे व्यसन असते. मनात आनंद, उत्साह निर्माण करणे, झोप न येणे, भूक न लागणे अशी लक्षणे यात दिसून येतात.दैनंदिन संघर्षांचा, ताण-तणावाचा, मनातल्या निराशेचा सामना करण्याचा एक उपाय म्हणजे नशा अशी पळवाट शोधली जाते. परंतु कधीकधी उदासीनता, अतिचिंता आणि स्किझोफ्रेनिआ सारखा गंभीर मानसिक आजार असलेले रुग्ण आपल्या लक्षणांपासून सुटका म्हणून व्यसनांचा आधार घेतात.व्यसन असणे हा एक मानसिक, शारीरिक आजार आहे हे त्यासाठी जाणून घेतले पाहिजे. मादक पदार्थाची नशा चढते. मेंदूत घडणाऱ्या रासायनिक बदलांमुळे आणि आपल्या मेंदूतील आनंद (ीशुरीव लशर्पीीश) देणाऱ्या केंद्रामुळे ती नशा पुन्हा करून बघावी असे वाटते आणि हळूहळू मादक पदार्थ घेण्याची सवय लागते. पुरेशी नशा मिळवण्यासाठी आता पूर्वीचे प्रमाण पुरत नाही. मादक पदार्थाचे प्रमाण यातून वाढत जाते. आता अशी स्थिती निर्माण होते की मादक पदार्थ घेतला नाही, तर अनेक शारीरिक आणि मानसिक लक्षणे (ळींहवीरुश्रीूीिी) निर्माण होतात. ही लक्षणे टाळण्यासाठी पुन्हा नशेकडे पाय वळतात. दिवसभर मनात नशेसाठी पैसे मिळवणे, नशीला पदार्थ काहीही करून मिळवणे हाच ध्यास राहतो. अशी स्थिती आली की समजावे 'व्यसन' जडले. आपल्याला व्यसनाचे दुष्परिणाम शरीरासह संपूर्ण आयुष्यावर होतात.हे समजूनही नशेपासून दूर राहण्याची इच्छा होत नाही.अशा अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यावी लागते. सर्व सुजाण तरुण वर्गांना विनंती आहे की,आपण व्यसनाच्या आहारी जाऊ नये.वेळीच सावध होऊन व्यसन जडल्यास या दिवाळी मध्ये एक पणती व्यसनतमुक्तीसाठी लाऊन व्यसन सोडून द्यावे.तुम्हीच उद्याचे भावी शिल्पकार आहात.हा यशोरथ आपणच पुढे ओढणार आहोत.उद्याचे भविष्यकाळात उज्वल करण्यासाठी आपण सर्वांनी आज या मंगलप्रसंगी शपथ घेऊन व्यसनमुक्त भारत देश घडवू या!

महादेव शरणप्पा खळुरे
(राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक)

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT